ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २४ वे • अंक २१४ • शनिवार दि.२३ मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## नांदेड पोलीसांची कारवाई: शस्त्रांचा मोठा साठा जप्त

### ४७० तलवारी, २०९ खंजर, चाकू असा एकूण ७०३ शस्त्रांचे घबाड पोलीसांच्या हाती

नांदेड/प्रतिनिधी-गुरुद्वारा चौक परिसरातील एका शॉपींग कॉम्प्लेक्सवर स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी शुक्रवारी धाड टाकुन ७०३ शस्त्र जप्त केली आहेत.

गुरुद्वारा चौक परिसरातील शॉपींग कॉम्प्लेक्समधील एका व्यापाऱ्याच्या गोडाऊनमध्ये शस्त्रांचा साठा असल्याची माहिती स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली माहूरचे पोलीस उपअधीक्षक किरण भोंडवे यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरिक्षक अतुल भोसले, फौजदार मिलिंद सोनकांबळे व पोलीस कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी सायंकाळी शॉपींग कॉम्प्लेक्समधील दुकान क्रं.८ मध्ये छापा टाकला. पोलीसांची चाहुल लागताच दुकान मालक रणजितसिंघ रामसिंघ सरदार रा.नंदिग्राम सोसायटी,नांदेड हा पळून गेला. पोलीसांनी दुकानाची



झडती घेतली असता त्यामध्ये ४७० तलवारी, २०९ खंजर, चाकू व २४ फायटर असा ७०३ शस्त्रे पोलीसांना सापडली. पोलीसांनी सदरील १४ लाख रुपयांची शस्त्रे जप्त केली आहेत. फौजदार मिलिंद सोनकांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पान ४ वर

## राज्याकडे मान्सूनची झपाट्याने वाटचाल

### ७ जूनपासून पावसाची शक्यता

मुंबई/प्रतिनिधी- नैऋत्य मान्सूनची महाराष्ट्राकडे झपाट्याने वाटचाल सुरू झाली आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पुढील तीन ते चार दिवसांत मान्सून आणखी वेगाने पुढे सरकण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे यंदा महाराष्ट्रात मान्सून वेळेआधी म्हणजेच ७ जूनला पुण्यात दाखल होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

राज्यातील नागरिक आणि शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार, २३ मे रोजी मान्सूनने नैऋत्य अरबी समुद्र, आग्नेय अरबी समुद्र, कोमोरिन परिसर तसेच बंगालच्या उपसागराच्या काही भागांत प्रगती केली आहे. बंगालच्या उपसागरात सक्रिय झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे मान्सूनचा वेग वाढला असून पुढील काही दिवसांत तो आणखी जोर पकडणार आहे.यंदा मान्सून २६ मे रोजी केरळ किनारपट्टीवर दाखल होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यानंतर ५ जूनपर्यंत गोव्यात, ६ जूनला कोकणात आणि ७ जूनला पुण्यात मान्सून पोहोचू शकतो, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. त्यामुळे राज्यातील शेतकरी आता मान्सूनच्या आगमनाकडे उत्सुकतेने पाहत आहेत.विशेष म्हणजे, यंदा मान्सूनच्या सुरुवातीच्या टप्प्यात अरबी समुद्र किँवा बंगालच्या उपसागरात कोणतेही चक्रीवादळ निर्माण झालेले नाही. त्यामुळे मान्सूनच्या प्रवासात अडथळा येण्याची शक्यता कमी असून तो सुरळीतपणे पुढे सरकणार असल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे.दरम्यान, राज्यातील विदर्भ विभागात उष्णतेची तीव्र लाट कायम आहे. ब्रह्मपुरी येथे शनिवारी तब्बल पान ४ वर

## शाळांच्या सुट्या वाढण्याचे मंत्र्यांकडून संकेत

मुंबई/प्रतिनिधी-विदर्भासह राज्यातील अनेक भागांमध्ये उष्णतेची तीव्र लाट कायम असल्याने शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अशा परिस्थितीत नेहमीप्रमाणे १५ जूनपासून शाळा सुरू करण्याऐवजी त्या थेट २६ जूनपासून सुरू करण्याचा पर्याय सरकारच्या विचाराधीन असल्याची माहिती राज्याचे गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिली.

हवामान विभागाने विदर्भात पुढील काही दिवस उष्णतेची लाट कायम राहण्याचा इशारा दिला आहे. सध्या चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी हे देशातील सर्वाधिक तापमान नोंदवणारे शहर ठरले असून, येथे तब्बल ४७.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. वाढत्या तापमानामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असून, विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे. अकोला, अमरावती आणि वर्धा जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने रेड अलर्ट जारी केला आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना मंत्री पंकज भोयर म्हणाले, १० जूननंतरही विदर्भात उष्णतेची लाट कायम राहिली, तर विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून १५ जूनऐवजी २६ जूनपासून शाळा सुरू करण्याबाबत सरकार गांभीर्याने विचार करेल. शालेय शिक्षण विभाग लवकरच बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेणार असून, त्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल.दरम्यान, उष्णतेचा परिणाम उच्च शिक्षण व्यवस्थेवरही दिसून येत आहे. नागपूर विद्यापीठातील सर्व परीक्षा सकाळच्या सत्रात घेण्याचा निर्णय घेण्यात आला असून, विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी परीक्षा केंद्रांची संख्या वाढविण्यात येणार असल्याची माहितीही भोयर यांनी दिली.

## 'कॉक्रोच'चे संस्थापक दिपकेंच्या घरी पोलिस तैनात

### पक्षाचे वेबसाईट,सोशल मिडियाचे खाते बंद

छ. संभाजीनगर : सरन्यायाधीश यांनी युवकांसंदर्भात केलेल्या वक्तव्याचा धागा पडकत कॉक्रोच जनता पार्टी नावाने एक सोशल मिडिया अकाऊंट आणि पक्ष सुरू केलेल्या अभिजीत दिपकेंच्या घराला पोलीस संरक्षण देण्यात आले आहे. तर दुसरीकडे कॉक्रोच जनता पार्टीचे वेबसाईट, इंस्टाग्राम, फेसबुक आदी समाज माध्यमांवरील अकाऊंटस बंद करण्यात आल्याने एकच खळबळ उडाली आहे.

अभिजीत दिपकेंनी सुरू केलेल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या इंस्टा आणि ट्विटरवरील अकाऊंने अवघ्या ४ दिवसांतच १० मिलियन्सचा टप्पा पार केला होता. या माध्यमातून सरकारला लक्ष्यही करण्यात येऊ लागल्याने अभिजीत दिपकेंना धमक्याही देण्यात आहेत. त्याच पार्श्वभूमीवर पोलिसांनी पान ४ वर

## महागाईच्या आगीत दरवाढीचा भडका!

### आठवड्यात तिसऱ्यांदा पेट्रोल-डिझेलच्या दरात वाढ

मुंबई/प्रतिनिधी-देशभरातील सर्वसामान्यांना महागाईचा आणखी एक मोठा झटका बसला असून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात अवघ्या आठ ते नऊ दिवसांत तिसऱ्यांदा वाढ करण्यात आली आहे. शनिवारी सकाळपासून लागू झालेल्या नव्या दरानुसार पेट्रोलच्या प्रतिलिटर दरात ८७ पैशांची तर डिझेलच्या दरात ९१ पैशांची वाढ झाली आहे. त्यामुळे मुंबईत पेट्रोलचा दर १०८.४५ रुपये प्रतिलिटरवर, तर डिझेलचा दर ९५.०२ रुपये प्रतिलिटरवर पोहोचला आहे.

यापूर्वी १५ मे रोजी पेट्रोलमध्ये ३ रुपये आणि डिझेलमध्ये ३.११ रुपयांची वाढ करण्यात आली होती. त्यानंतर २० मे रोजी पुन्हा पेट्रोल ८६ पैसे आणि डिझेल ८३ पैशांनी महागले होते. आता तिसऱ्यांदा झालेल्या वाढीमुळे वाहनधारक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला मोठी झळ बसत आहे. सलग वाढणाऱ्या दरांमुळे आगामी काळात आणखी महागाई वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढल्याने भारतीय पेट्रोलियम कँम्न्यांवर आर्थिक ताण वाढला आहे. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका संपल्यानंतर केंद्र सरकारने या तोट्याचा काही भार सर्वसामान्य ग्राहकांवर टाकण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे.

## भर उन्हात जनगणनेसाठी शिक्षकांची भटकंती

माहूर/प्रतिनिधी-एकीकडे राज्यात उष्माघाताच्या घटनांमध्ये वाढ होत असताना दुसरीकडे जनगणनेच्या नावाखाली शिक्षकांना अक्षरशः भर उन्हात रस्त्यावर भटकंती करायला लावले जात असल्याचे चित्र माहूर तालुक्यात दिसून येत आहे. तब्बल ४२ अंश तापमानात गळ्यात बॅग, हातात कागदपत्रे आणि डोक्यावर टोपी घालून प्राथमिक व माध्यमिक शिक्षक घरोघरी जाऊन माहिती संकलन करत आहेत.



माहूर शहरासह ग्रामीण भागात जनगणना मोहिमेसाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांची प्रगणक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.व राष्ट्रीय कार्य जनगणनेची शिक्षकांना ड्युटी देण्यात आली आहे. हे कर्तव्य पार पाडत असताना शिक्षकांना सकाळपासून दुपारपर्यंत उन्हात पायपीट करावी लागत आहे. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी वर्षभर झटणाऱ्या शिक्षकांनाच आता उन्हाळ्याच्या सुट्टीतही विश्रांती मिळालेली नाही. कुटुंबासोबत वेळ घालविण्याचे किंवा स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्याचे नियोजन करणाऱ्या शिक्षकांना थेट जनगणनेच्या कामाला जुंपण्यात आले आहे. शिक्षक म्हणजे प्रशासनाचे कायमचे बहुउद्देशीय कर्मचारी का? असा संतप्त सवाल आता शिक्षक वर्गातून उपस्थित केला जात आहे. राष्ट्रीय जबाबदारी पार पाडणे हे शिक्षकांचे कर्तव्य असले तरी त्यांच्या जीविताची जबाबदारी कोण घेणार? ४२ ते ४३ अंश तापमानात उष्माघाताचा धोका असताना प्रशासनाने कोणती सुरक्षा योजना आखली आहे का, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. शिक्षकांना केवळ आदेश देऊन रस्त्यावर उतरविणे सोपे असले तरी त्यांच्या आरोग्याचा विचार करणेही पान ४ वर

## दिल्लीतील जनजाती संस्कार समागम गर्जना रॅलीसाठी किनवटहून दीड हजार आदीवासी बांधव रवाना

किनवट/प्रतिनिधी-जनजाती आदिवासी समाजाच्या आरक्षणाचे रक्षण, सांस्कृतिक अस्मिता आणि वाढत्या धर्मांतराच्या मुद्द्यावर देशभरात जनजागृती करण्यासाठी जनजाती सुरक्षा मंच व देवगिरी कल्याण आश्रम यांच्या संयुक्त विद्यमाने २४ मे रोजी दिल्लीतील ऐतिहासिक लाल किल्ला मैदानावर भव्य जनजाती संस्कार समागम गर्जना रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या राष्ट्रीय आंदोलनात किनवट जिल्ह्यातून सुमारे १५०० आदिवासी प्रतिनिधी दिल्लीकडे रवाना झाले असल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली आहे.

या संदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत देवगिरी कल्याण आश्रमाचे प्रांत उपाध्यक्ष डॉ. उत्तम धुमाळे, जिल्हाध्यक्ष तुकाराम पेंदोर, जिल्हा सचिव विश्वनाथ नखाते व प्रांत सदस्य प्रकाश टारपे यांनी रॅलीच्या उद्देशाबाबत सविस्तर भूमिका मांडली.पत्रकारांशी संवाद साधताना पदाधिकाऱ्यांनी डीलिस्टिंग ही या आंदोलनाची मुख्य मागणी असल्याचे अधोरेखित केले. ज्या व्यक्तींनी धर्मांतर करून मूळ आदिवासी संस्कृती, रूढी-परंपरा आणि श्रद्धास्थानं सोडली आहेत, त्यांना अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा आणि इतर सवलतींचा लाभ मिळता कामा नये, अशी ठाम भूमिका मंचाने घेतली आहे. मूळ आदिवासींच्या हक्कांवर गदा येऊ नये म्हणून हा लढा उभारला गेल्याचे त्यांनी सांगितले. दुर्गम आणि आदिवासी बहुल भागांमध्ये शिक्षण, आरोग्य सेवा आणि आर्थिक प्रलोभनांचा गैरफायदा घेऊन मोठ्या प्रमाणावर जाणीवपूर्वक धर्मांतर घडवून आणले जात असल्याचा गंभीर आरोपही पदाधिकाऱ्यांनी यावेळी केलाय. या प्रकारांमुळे आदिवासींची मूळ संस्कृती, पारंपरिक वारसा आणि अस्मितेला मोठा धोका निर्माण झाला असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केलीय. दिल्लीत होणाऱ्या या ऐतिहासिक गर्जना रॅलीमध्ये केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर देशभरातील विविध जनजाती संघटना, सामाजिक कार्यकर्ते आणि आदिवासी समाजाचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. किनवटमधून निघालेला हा दीड हजार प्रतिनिधींचा जथा दिल्लीतील आंदोलनात जिल्ह्याचा आवाज बुलंद करणार असल्याचे सांगितले.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचं आवाहन अन् जावयांची धडधड!

### अधिकमासात सोन्याच्या अंगठीवर संकट;यंदा स्टील रिंग सेरेमनीची चर्चा

**सरफराज दोसानी**

माहूर:जागतिक पातळीवर इंधन आणि गॅस तुटवड्याचे पडसाद आता भारतीय घराघरातही उमटू लागले आहेत. पेट्रोल-डिझेल जपून वापरा, अनावश्यक खर्च टाळा, सोने खरेदीला ब्रेक लावा आणि परदेशी पर्यटन टाळा, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना केले. पण या आवाहनाचा सर्वात मोठा फटका जर कुणाला बसत असेल, तर तो म्हणजे अधिकमासातील जावईबापूंना.

१७ मेपासून अधिक मास अर्थात पुरुषोत्तम मास सुरू झाला असून, हिंदू संस्कृतीत या महिन्याला धार्मिक आणि कौटुंबिक महत्त्व आहे. विशेषतः जावयांचा मान राखण्यासाठी सासरकडून सोन्याची अंगठी, चैन किंवा इतर भेटवस्तू देण्याची परंपरा अनेक वर्षांपासून सुरू आहे. मात्र यंदा सोन्याचे वाढते दर आणि सोनं कमी खरेदी करा या आवाहनामुळे अनेक सासऱ्यांनी मनोमन सुटकेचा निश्वास टाकल्याची चर्चा रंगली आहे. देशहितासाठी त्याग करावा लागेल असे सांगत काही सासरे मंडळींनी जावयांच्या अंगठीवर आर्थिक निर्बंध लागू करण्याची तयारी सुरू केल्याची माहिती घरगुती सूत्रांकडून मिळत आहे.



त्यामुळे अनेक जावईबापूंची झोप उडाली असून, यंदा सोन्याऐवजी स्टीलची अंगठी मिळाली तर? अशी भीती त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत आहे. अधिक मासात जावयांचा वनवास, गोल्ड रिंग ऐवजी की-रिंग मिळणार, देश वाचवा, जावई थांबवा अशा भन्नाट पोस्ट व्हायरल होत आहेत. दुसरीकडे सासुरवाडीतील मंडळींमध्ये मात्र कमालीचा उत्साह दिसून येत आहे. परंपरा महत्त्वाची पण बजेट त्याहून महत्त्वाचं! असा सूर अनेक ठिकाणी ऐकायला मिळत आहे. काहींनी तर यंदा अंगठी नाही, पण आशीर्वाद फुल्ल अशी नवीन ऑफरच जाहीर केल्याची चर्चा आहे. दरम्यान, जावई संघटनांकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नसली तरी सोनं नाही तर किमान चांदी तरी द्या अशी मागणी लवकरच पुढे येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.सोशल मीडियावरही याची जोरदार खिल्ली उडवली जात आहे

## महायुतीच्या जागा वाटप अंतिम टप्प्यात-ना.बावनकुळे

मुंबई/प्रतिनिधी-महाराष्ट्र विधान परिषदेच्या १७ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीमध्ये जागावाटपावरून जोरदार चर्चा सुरू असून, या चर्चेचा फॉर्म्युला आता अंतिम टप्प्यात पोहोचल्याची माहिती मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. शिवसेनेने या निवडणुकीत तब्बल ७ जागांवर दावा केल्याने महायुतीतील राजकीय समीकरणांबाबत उत्सुकता वाढली आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने यापूर्वीच्या ५ जागांसह वाढलेल्या ताकदीच्या आधारावर आणखी २ जागांची मागणी करत भाजपसमोर ७ जागांचा अधिकृत प्रस्ताव ठेवला आहे. या पार्श्वभूमीवर शनिवारी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांच्या नंदनवन या शासकीय निवासस्थानी भेट घेतली. या बैठकीत विधान परिषद निवडणुकीतील जागावाटपासंदर्भात सविस्तर चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे.बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, महायुतीत जागावाटपाचा फॉर्म्युला पान ४ वर

## मुबलक डिझेल साठा आहे, तर गेला कुणीकडे?

**देशात इंधनाचा प्रश्न हा केवळ अर्थकारणापुरता मर्यादित राहत नाही, तर तो थेट सामान्य नागरिकांच्या जीवनाशी आणि विशेषतः शेतीसारख्या मूलभूत क्षेत्राशी जोडलेला असतो. गेल्या काही महिन्यांपासून जगभरात इंधनाच्या उपलब्धतेबाबत निर्माण झालेली अस्थिरता अनेक प्रश्न उपस्थित करत आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील संघर्ष, जागतिक पुरवठा साखळीतील अडथळे आणि वाढती मागणी यामुळे अनेक देशांमध्ये इंधन तुटवड्याचे संकट निर्माण झाले आहे. अशा परिस्थितीत आपल्या देशातही डिझेल टंचाईची चर्चा पुढे येत आहे. विशेषतः महाराष्ट्रातील मराठवाडा भागात शेतकऱ्यांना डिझेल मिळण्यात येणाऱ्या अडचणींमुळे चिंता वाढू लागली आहे. विशेष बाब म्हणजे शासन आणि प्रशासनाच्या स्तरावर सातत्याने डिझेलचा मुबलक साठा उपलब्ध असल्याचे सांगितले जात आहे. मुख्यमंत्री असोत किंवा जिल्हाधिकारी, सर्वांकडून नागरिकांना आश्वस्त करण्याचा प्रयत्न होत आहे. मात्र प्रत्यक्ष परिस्थिती यापेक्षा वेगळी दिसत आहे. जर डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असेल, तर तो बाजारपेठेत आणि गरजूंपर्यंत पोहोचत का नाही?, हा प्रश्न स्वाभाविकपणे उपस्थित होतो. कारण साठा असणे आणि तो योग्य वेळी योग्य ठिकाणी पोहोचणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. सध्या हा प्रश्न अधिक गंभीर वाटण्याचे कारण म्हणजे त्याचा थेट परिणाम शेतीवर होत आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीच्या काळात शेतकऱ्यांना शेत मशागतीची तयारी करावी लागते. एकेकाळी बैलांच्या साहाय्याने होणारी नांगरणी आणि वखरणी आता बहुतांश प्रमाणात यांत्रिकीकरणावर अवलंबून झाली आहे. ट्रॅक्टर, पंप, हार्वेस्टर आणि इतर कृषी यंत्रणा डिझेलवर चालतात. हवामान विभागाने यंदा पाऊस वेळेवर होण्याचा अंदाज व्यक्त केला असल्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीची तयारीही वेगाने सुरू केली आहे. परंतु याच काळात डिझेलची कमतरता जाणवू लागल्यास त्याचा थेट परिणाम उत्पादनावर होऊ शकतो. एखाद्या उद्योगासाठी उत्पादनात काही दिवसांचा उशीर परवडू शकतो; परंतु शेतीच्या बाबतीत वेळेला अत्यंत महत्त्व असते. पेरणी, मशागत आणि इतर कामे वेळेत झाली नाहीत, तर त्याचे परिणाम संपूर्ण हंगामावर होतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या गरजेच्या काळात इंधन पुरवठा सुरळीत ठेवणे ही शासनाची जबाबदारी ठरते. जर काही भागात डिझेल उपलब्ध असेल आणि काही भागात तुटवडा जाणवत असेल, तर हा प्रश्न केवळ साठ्याचा नाही, तर नियोजनाचा आणि वितरण व्यवस्थेचा आहे. यामध्ये आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे नागरिकांमध्ये निर्माण होणारा संभ्रम. एका बाजूला सरकारकडून मुबलक साठा असल्याचा दावा केला जातो आणि दुसऱ्या बाजूला पेट्रोलपंपांवर रांगा दिसतात किंवा डिझेल सहज उपलब्ध होत नाही. अशा परिस्थितीत नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होते. अनेकदा भविष्यात तुटवडा वाढेल या भीतीमुळे अतिरिक्त साठेबाजीही सुरू होते आणि त्यामुळे परिस्थिती आणखी बिघडते. शासनाने केवळ आश्वासने देऊन चालणार नाही, तर प्रत्यक्ष स्थितीचा वस्तुनिष्ठ अभ्यास करणे आवश्यक आहे. कोणत्या भागात किती मागणी आहे, पुरवठ्यात नेमक्या कुठे अडचणी येत आहेत, वाहतूक किंवा वितरण प्रक्रियेत काही त्रुटी आहेत का, याचा सखोल आढावा घेणे गरजेचे आहे. विशेषतः कृषीप्रधान भागांना प्राधान्याने डिझेल पुरवठा करण्यासाठी स्वतंत्र नियोजन करणे आवश्यक आहे. देश आर्थिक आणि जागतिक संकटांचा सामना करत असताना नागरिकांना वास्तव परिस्थितीची माहिती देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. परिस्थिती कठीण असेल तर ती स्पष्टपणे सांगून त्यावर उपाययोजना राबवणे हे अधिक विश्वासार्ह ठरते. कारण केवळ ''साठा मुबलक आहे'' असे सांगून समस्या सुटत नाहीत. आज शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झालेला एकच प्रश्न आहे. जर डिझेलचा साठा खरोखरच मुबलक असेल, तर तो नेमका गेला कुणीकडे? या प्रश्नाचे उत्तर शोधणे ही आजच्या प्रशासनासमोरील खरी कसोटी आहे.**

# चित्रपटंही करु शकतात संस्कार

प्राचीन काळात होती काय सुसंस्कारीत पिढी? असा विचार केल्यास त्याचं उत्तर नाही असंच निघतं. खुद्द रामायणाचा काळ पाहिल्यास त्या काळात आपल्या मातेचं वचन पाळणारा राम आपल्याला दिसतो. परंतु आग लावणारी मंथरा पडद्याआड दिसते. तिची आग लावणं आपल्याला दिसत नाही. मग ज्या रामावर संस्कार केलेले दिसतात. त्याच मंथरेवर संस्कार केलेले दिसत नाहीत. शिवाय ज्या कैकेयीला मंथरेकडून भडकवलं जातं. ती कैकेयीही संस्कारी दिसत नाही. तिची भावना ही लोप झालेली दिसते. तिनं पुत्रासमान असलेल्या आपल्या सवतीच्या बाळाला वनवास दिला, पुत्रलोभानं. शिवाय म्हणतात की रामानं राजसत्ता सांभाळल्यावर शंभूक ऋषींची हत्या केली. कारण तो शुद्र होता व शुद्रांना तपश्चर्या करण्याचा अधिकार नव्हता. शंभूक ऋषी तपश्चर्या करतांना दिसला. म्हणूनच त्याची हत्या. ज्याच्या हत्येत राम हा दोषी ठरतो. परंतु शंभूक ऋषींची हत्या करण्याची आग लावणारा व्यक्ती दोषी दिसत नाही. इथं जो राजसत्ता सांभाळतो. त्यालाच कळतं की राज्य कसं चालवावं.




राज्य चालवतांना चूक बरोबर न पाहता अधिभार पाहावा लागतो. जनमत जर हत्येच्या बाजूनं असेल, तर हत्या करावीच लागते मनात इच्छा नसतांनाही. तेच घडलं रामाच्याही बाबतीत. इच्छा नसतांना केवळ जनमताचा विचार करुन शंभूकांची हत्या केली गेली व स्वतःच्या माथ्यावर एका निरपराध माणसाच्या खुनाचा डाग लावण्यात आला. हीच स्थिती महाभारतकाळ अनुभवतांना दिसते. आईच्या आज्ञेत वागणारे नव्हे तर जेष्ठ भावाच्या आज्ञेत वागणारे वीर आणि बलदंड असणारे भाऊमोठा भाऊ द्युत खेळत असतांना त्याला विरोध करीत नाहीत. शिवाय तो आपल्या भावांना व आपल्या पत्नीलाही द्युतात डावावर लावतो. तरीही ते विरोध करीत नाही. हा संस्कार दिसतो आणि आपल्याच भावांना दास बनवून आपल्याच वहिणींनी अब्रू लुटणाऱ्या दुर्योधनावर झालेले संस्कार हे कुसंस्कार वाटतात आपल्याला.

संस्कार...संस्कार दोन प्रकारचे असतात. एक म्हणजे सुसंस्कार व दुसरा प्रकार आहे कुसंस्कार. संस्कार हे केले जात नाहीत. होत असतात. महाभारतात दाखवलं आहे की कौरव आणि पांडव द्रोणाचार्य ऋषीच्या आश्रमात शिकत असतांना द्रोणाचार्य दोघांवरही सुसंस्कारच करण्याचा प्रयत्न करतो. परंतु पांडवांवर सुसंस्कार होतात व कौरवांवर कुसंस्कार. असे का? त्याचं कारण आहे वातावरण आणि तुमचं मन. आपल्यात उपजत जे गुण असतात. ते गुण कोणत्याही पद्धतीनं बदलवता येत नाहीत. ते उपजत गुण आपल्या मनानुसार वृद्धींगत होत असतात. एव्हाना, भक्त प्रल्हादानं हिरण्यकक्षपूच्या पोटी जन्म जरी घेतला असेल तरी तो राक्षस बनत नाही. कारण त्याच्यामध्ये जन्मापासून असलेला सात्विक गुण. हा सात्विक गुण लोकांमध्ये जन्मापासूनच उपजत सारखा असतो. म्हणतात ना की कुत्र्याचं शेपूट कुठंही घातलं तरी वाकडंच राहणार. तसंच आहे संस्काराचं. संस्कार हे कोणत्याही प्रक्रियेनं बदलवता येत नाही.

हं, संस्काराचा गुण तेवढा वाढवता येतो. जर एखाद्याच्या व्यवहारात जन्मापासून सात्विक गुण असेल तर तो वाढवता येवू शकतो. ज्याला संस्कार म्हणता येईल. तसेच कुसंस्कारही वाढवता येतात. काही संस्कार तर आईवडिलांच्या मार्फत होत असतात. जसे आईवडील तसेच संस्कार. जर आईवडील हे कुसंस्कारी असतील तर हमखास कुसंस्कार होतात आणि सुसंस्कारी असतील तर हमखास सुसंस्कार. परंतु हे जरी खरं असलं तरी बरेचदा उलट घडतं. सुसंस्कारी कुटुंबातील मुलं हे कुसंस्कारी बनू शकतात आणि सुसंस्कारी कुटुंबातील मुलं हे सुसंस्कारी. याचं कारण आहे परिसरातील घटना व दृश्य. त्या घटना जर सौजन्यशील असतील वा सोज्वळ आणि त्या विद्यार्थ्यांच्या मनाला अनुकूल असतील तर परिस्थितीनुसार माणूस बदलतोच. जसा वाल्याचा वाल्मिक बनतो. अंगुलीमालचा अहिंसक बनतो आणि आम्रपालीची भिक्षुणी आम्रपाली. हा बदल का झाला? हा बदल झाला, त्याच्यासमक्ष घडलेल्या घटनांनी.

**अंकुश शिंगाडे**
नागपूर.


आजही तसा अपेक्षित वर्तनबदल आपल्या मुलात घडू शकतो. जर त्याच्यासमोर तशी परिस्थिती निर्माण केली तर...तसे सुसंस्कार हे मोठेपणी न करता लहानपणापासूनच केले तर बरं. कारण मोठ्या झालेल्या झाडाची फांदी लवकर मोडते. तशी लहान रोपट्याची फांदी लवकर तुटत नाही. ती वाकते. असे का? तर मोठ्या झाडाच्या फांदीत ताठरपणा आलेला असतो. तसा ताठरपणा लहान फांदीत नसतो. लहान बाळाची हाडं ही लवचीक असतात. ती मोडली की लवकर जुळतात. तसं मोठ्या माणसाचं होत नाही. तसंच आहे सुसंस्काराचं. सुसंस्कारही लहानपणी योग्य पद्धतीनं केले जावू शकतात. कारण त्यावेळेस बाळांचं मन तेवढ्या प्रमाणात विकसित झालेलं नसतं. त्याला योग्य अयोग्य काय असतं. ते कळत नाही. ते मूल लहानपणी फुलपाखरु, सरडे मारतात. सरड्यांना तंबागू चारुन नाचवतात. कारण त्यांना मजा येते. त्यावेळेस त्यांना उपरोक्त प्राण्यांना वेदना होत असतात. ते मरत असतात. ते कळत नाही.

महत्वाचं सांगायचं म्हणजे सुसंस्कार हे केले जावू शकतात योग्य अशा माध्यमांनी. ज्यात आजच्या काळात सशक्त माध्यमं आहेत चित्रपटं. अलिकडील काळात मुलांना कार्टून जास्त आवडतं. कार्टून चित्रपटंही जास्त आवडतात. तसेच एखाद्या चित्रपटात मारझोड असेल तर ते त्याला जास्त आवडतं. तशीच कृती ते मूल दिवसभर करीत असतं. आपण पाहिले आहे की लहानपणी टिव्हीवर रामायण सिरीयल लागायचं. मुलं ते सिरीयल आवडीनं पाहात व त्याची कृती करतांना धनुष्यबाण बनवत व खेळत असत. हा वर्तनबदल कशावरुन दिसायचा? तो दिसायचा, त्या बालवयात रामायण नावाची सिरीयल पाहिल्यानं. जे रामायण काल लहान मुलांवर योग्य ते संस्कार करीत होतं. आजच्या काळात तशाच प्रकारच्या सिरीयला वा चित्रपटं काढून ते चित्रपट लहान मुलांना दाखवले तर नक्कीच लहान लहान मुलांवर योग्य ते संस्कार नक्कीच करता येवू शकतील यात शंका नाही.

विशेष म्हणजे प्राचीन काळात लहान मुलांवर कसे संस्कार करायचे. यासाठी माध्यम नव्हते. म्हणूनच त्यावेळेस विचार यायचा. त्यामूळं शिक्षक नावाचा एक घटक निर्माण झाला की जो आपल्या लहान मुलांना योग्य काय आणि अयोग्य काय, ते समजावून सांगेल. तो सांगायचाही व त्यानुसार मुलं घडतंही. परंतु आज मात्र तसं नाही. आजचा शिक्षकच व्यसनाच्या आहारी गेलेला दिसतो. तो व्याभिचारात तल्लीन असलेला दिसतो. काही शिक्षक नावाचं व्यक्तीमत्व संस्थाचालक जेव्हा बनतो. तेव्हा तो पैसे खाण्यात लीन असतो. त्यामुळं शिक्षकांवर आजच्या काळात पाहिजे त्या प्रमाणात विश्वास ठेवता येत नाही. मग सुसंस्कार तर मुलांवर करायचे. त्याला मग नेमका मार्ग कोणता? आजच्या काळातील तो मार्ग आहे, चांगले चित्रपट दाखवणे. चांगले चित्रपट सतत दाखवल्यानं जे संस्कार विद्यार्थ्यांवर रुजू शकतील. ते संस्कार कधीच मिटणारे नसतील. परंतु आज ओबडधोबड चित्रपटं निर्माण केली जात आहेत. ज्यात मादकता व अश्लिलता असते. हा पैसे मिळविण्याचा खेळ असतो. परंतु याकडे न पाहता चित्रपट निर्मात्यानं वा दिग्दर्शकानं केवळ पैसा कमवता यावा म्हणून ओबडधोबड चित्रपटं काढू नयेत. कारण सुसंस्कारही महत्वपुर्ण असतात. त्यामुळं असेच चित्रपटं काढावेत की जे लहान लहान मुलांवर सुसंस्कार करतील. त्यांचं भवितव्य घडवतील. जेणेकरुन तेच भवितव्य त्यांच्या पुढील यशस्वी जीवनाच्या आणि देशाला योग्य आकार देण्याच्या कामी येतील. यात शंका नाही.

# तीस कोटी रु.निधीचा बांबूसंशोधन प्रकल्प ५ वर्षापासून रखडला

## १ कोटी रु.किमतीच्या मशिनरी पडल्या धुळखात



**बी.आर.पांचाळ**

भोकर:भोकर पासून जवळच असलेल्या नारवाट शिवारात महाराष्ट्र शासनाच्या वन विभागामार्फत २०२१ साली बांबू संशोधन प्रकल्प मंजूर झाला. त्यासाठी ३० कोटी रुपयाचा निधी देखील मंजूर करण्यात आला मात्र ५ वर्षापासून रोजगार व मजुरांसाठी महत्वकांक्षी असलेला हा प्रकल्प रखडल्याने रोजगाराची मोठी संधी हुकली असून प्रकल्प सुरू झाला असता तर आदिवासी भागातील ५०० मजुरांना दररोज काम मिळाले असते.

**बांबू प्रकल्पाचे काम लवकरच सुरू करणार**

या प्रकल्पासाठी जागेची अडचण होती १.७० हेक्टर जागा वन विभागाला मलकजांब येथे देण्यात आली इतर सर्व राहिलेल्या प्रक्रिया पूर्ण करून लवकरच या प्रकल्पाचे काम सुरू करण्यात येणार आहे.

**- अंगद खटाणे**
वनपरिक्षेत्र अधिकारी भोकर

भोकर तालुक्यातील विविध विकास कामांना प्राधान्य देण्यासाठी माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांनी सातत्याने आपले प्रयत्न चालू ठेवले आहेत. त्यापैकीच नारवाट शिवारातील बांबू संशोधन प्रकल्प हा असून ३० कोटी रुपयाचा निधी २०२१ साली तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना अशोकराव चव्हाण यांनी मंजूर करून घेतला. काही दिवस त्या प्रकल्पासाठी जागेबाबत अडचण निर्माण झाली होती. जागेचा प्रश्न मार्गी लागल्यानंतर प्रकल्पाचे काम सुरू व्हायला पाहिजे होते. मात्र भोकर सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ३० कोटी रुपयांचा निधी वर्ग करून सुद्धा प्रकल्पाचे बांधकाम करण्यात आले नाही. मागील ५ वर्षापासून काम रखडले त्यामुळे या भागातील मजूरदार रोजदारांची संधी दूर गेली आहे.

तालुक्यातील आदिवासी भागात राहणाऱ्या मजुरांकडून बांबू पासून बनविण्यात येणाऱ्या विविध वस्तू तयार करण्यासाठी व त्याचे प्रशिक्षण देण्यासाठी हा प्रकल्प मंजूर करण्यात आला. त्यासाठी प्रारंभी १ कोटी रुपये किमतीच्या मशिनरी सुद्धा येऊन पडल्या. प्रकल्प इमारतीचे बांधकाम न झाल्याने सदर मशीनरी भोकर वनपरिक्षेत्र कार्यालयात आणून बसविण्यात आल्या. काही दिवस तिथे वस्तू बनविण्यात आल्या. चंद्रपूर येथून बांबू देखील मागविण्यात आले होते. ३ महिने या ठिकाणी भोकर, पोमनाळा, तळेगाव या ठिकाणच्या मजुरांनी काम करून चटई, सोफा, खुर्च्या, शोच्या वस्तू, हस्तकला, बनविल्या होत्या मात्र त्यानंतर हे काम बंद पडले. आणून ठेवलेला बांबू सुद्धा त्याच ठिकाणी जाग्यावर सडून गेला, बऱ्याच दिवसापासून मशीनरी धुळखात पडले आहेत. तत्कालीन वनविभागाच्या अधिकाऱ्याने मात्र यासाठी कोणतेही प्रयत्न केलेले दिसून आले नाही.

**५०० मजुरांच्या हाताला मिळाला असता रोजगार**

भोकर तालुक्यातील आदिवासी भागात राहणाऱ्या कामगारांना रोजंदारी मजुरांना बांबू पासून बनविणाऱ्या वस्तू तयार करण्यासाठी काम मिळावे, बांबू लागवड करून बांबूचे क्षेत्र वाढवावे यासाठी हा प्रकल्प होता. हा प्रकल्प वेळेवर सुरू झाला असता तर दररोज ५०० मजुरांना काम मिळाले असते. त्यापासून बनविण्यात येणाऱ्या वस्तू विक्री झाल्यानंतर सुद्धा शासनाला आर्थिक फायदा झाला असता. तत्कालीन वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी या कामासाठी अनास्था दाखविल्याने सदर प्रकल्प रखडला परिणामी ५०० लोकांना मिळणारा रोजगार देखील ५ वर्षापासून बुडाला.

भोकर पासून जवळच असलेल्या नरवाट शिवारातील जंगलात हा महत्त्वकांक्षी प्रकल्प मंजूर झाला मराठवाड्यातील हा पहिला प्रकल्प असून यासाठी अनास्था कोणाची हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. निधी मंजूर झाला जागा उपलब्ध झाली सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निधी वर्ग करण्यात आला. यासाठी अडचण कशाची होती तत्कालीन वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी अनास्था दाखविल्याने सदर प्रकल्पाचे काम रखडले. आदिवासी मजुरांचा रोजगार बुडाला तालुक्याच्या विकास कामाला अडचण निर्माण झाली यासाठी जबाबदार कोण? हा प्रश्न मात्र जनतेतून उपस्थित केला जात आहे.

**१२ कोटी रुपयाचे वन्यप्राणी उपचार केंद्र बंद स्थितीत**

महाराष्ट्र शासन वन विभागाच्या वतीने नारवाट शिवारामध्येच १२ कोटी रुपये खर्चाचे वन्यप्राणी उपचार केंद्र सुसज्ज असे बांधण्यात आले बांधकाम होऊन ३ महिन्याचा कालावधी लोटला मात्र त्या ठिकाणी ना डॉक्टर नाहीत औषध पाण्याची व्यवस्था नाही. कर्मचारी नाहीत जंगलातील वन्य पशु जखमी झाल्यानंतर त्यांच्यावर उपचार करण्यासाठी वन्य प्राणी उपचार केंद्र बांधण्यात आले मात्र अजूनही ते सुरू करण्यात आले नसल्याने वन्य प्राण्यांना उपचार मिळत नाहीत. त्या ठिकाणी डॉक्टर व इतर सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

# २५ वर्षांपासून बंद असलेला शिवरस्ता १.५ कि.मी.पर्यंत खुला

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड तालुक्यातील सुगाव बुद्रुक, सुगाव खुर्द ते भानपूर या मार्गावरील शिवरस्त्यावर गेल्या अनेक वर्षांपासून अतिक्रमण झाले होते. संबंधित शेतकऱ्यांना रस्त्याचे महत्त्व समजावून सांगून त्यांच्या सहमतीने २२ मे २०२६ रोजी सुमारे १.५ कि.मी. लांबीचा रस्ता खुला करण्यात आला.

मा. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ तसेच तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड तालुक्यात शिवरस्ते व पाणंद रस्ते मोकळे करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे.या कारवाईवेळी नायब तहसीलदार (महसूल) सुनिल माचेवाड, मंडळ अधिकारी नाळेश्वर, कुणाल जगताप, तलाठी सज्जा वाघी राजेश बरोडा तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक व शेतकरी उपस्थित होते.यापुढेही अशाच प्रकारचे शिवरस्ते खुले करण्यात येणार असल्याचे तहसीलदार संजय वारकड यांनी सांगितले. तसेच रस्ते अडविणाऱ्या शेतकऱ्यांना पुढे शासकीय लाभांपासून वंचित ठेवण्याचा इशाराही त्यांनी दिला. पावसाळ्यात शेतात जाण्यासाठी शेतकऱ्यांना चिखलातून जावे लागत होते. आता रस्ता मोकळा झाल्याने शेतकऱ्यांनी साखर वाटून आनंद व्यक्त केला.यावेळी दत्ता भोसले, बाबुराव शिंदे, नामदेव शिंदे, दत्तराव तातेराव भोसले, विजय भोसले, गंगाधर भोसले, संतोष भोसले, जळबाजी भोसले आदी शेतकरी उपस्थित होते.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# जमिन कंपनीला विक्री करुन देतो म्हणून ५२ लाख रुपयांना फसविले

नांदेड/प्रतिनिधी-मौजे शेलगाव (धानोरा) ता.लोहा शिवारातील जमिन कंपनीला विक्री करुन देतो म्हणून सराफा व्यवसायीक व त्यांच्या सहकाऱ्यांची ५२ लाख रुपयांची फसवणूक करणाऱ्या प्रकाश केंद्रे याच्या विरुध्द सोनखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेड शहरातील सराफा भागात राहणारे व्यापारी सुरेशराव रुदकंठवार व त्यांच्या सहकाऱ्यांची शेलगाव (धानोरा) ता.लोहा शिवारात जमिन आहे. सदरील जमिनीपैकी ६ एकर ०.५ आर जमिन इस्कॉन टेम्पल मॅनेजमेंट कंपनीला जादा दराने विक्री करुन देण्याचे आमिष प्रकाश केशवराव केंद्रे रा.वर्कशॉप, नांदेड यांनी सुरेशराव रुद्रकंठवार यांना दाखविले. २७ ऑगस्ट २०२४ ते ५ एप्रिल २०२५ या काळात प्रकाश केंद्रे याने सुरेशराव रुद्रकंठवार, जमिनीचे मुळ मालक यांच्याकडून वेगवेगळे शपथपत्र लिहून घेतले. त्यांच्याकडून ऑनलाईन व रोख ५२ लाख ९२ हजार रुपये घेतले. पैसे घेवूनही प्रकाश केंद्रे यांनी जमिन कंपनीला विक्री करुन दिली नाही. तसेच घेतलेले पैसे परत सुध्दा केलेले नाही. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर रुद्रकंठवार यांनी सोनखेड पोलीस ठाण्यात धाव घेवून तक्रार दिली. या प्रकरणी प्रकाश केंद्रे याच्या विरुध्द सोनखेड पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भोकर तालुक्यात भरधाव वेगातील वाहनांमुळे अपघाताचे प्रमाण वाढले

## दर आठवड्याला होतो एका व्यक्तीचा मृत्यू

भोकर/प्रतिनिधी-राष्ट्रीय महामार्गाचे रस्ते चकाचक झाले गुळगुळीत झालेल्या रस्त्यांमुळे भरधाव वेगात वाहने धावत आहेत. अति वेगाने धावत असलेल्या वाहनामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून भोकर तालुक्यात दर आठवड्याला एका व्यक्तीचा मृत्यू अपघाताने होत आहे.

भोकर-नांदेड रोड, भोकर-म्हैसा रोड, भोकर-उमरी-बायपास रोड, भोकर-किनवट रोड शहराच्या बाजूने असलेले सर्व बायपास रस्ते अतिशय चकाचकित झाले आहेत. गुळगुळीत झालेल्या रस्त्यावर चालणारी वाहने भरधाव वेगात धावत आहेत. दुचाकी चालवणारे तरुण मुले आपली वाहने नियंत्रणात न ठेवता वेगात चालवत असल्याने अपघात होऊन मृत्यू होत आहेत. अपघातात मृत्यू होणाऱ्यामध्ये युवकांचे प्रमाण अधिक असून व्यसनाधीन अवस्थेमध्ये वाहन चालवत असल्याचे प्रकार देखील उघडकीस येत आहेत. नांदेड ते भोकर विटांच्या गाड्या दररोज भरधाव वेगात येतात. भंगार असलेल्या गाड्या जीर्ण झालेल्या गाड्या वाहन चालक भरधाव वेगात चालवतात. यामुळे अनेक वेळा अपघात झाले असून अशा गाड्यांमुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. सदर गाड्या जीर्ण झालेले आहेत, वाहन चालवण्याचा परवाना नाही, अन्य कागदपत्रे नाहीत, मात्र सदर गाड्या चालतात कशा?, आरटीओ सदर गाड्यांना अडवत का नाहीत? पोलीस यंत्रणेने सुद्धा अशा गाड्यांचा पाय बंद केले पाहिजे. त्यांच्याकडील कागदपत्र तपासले पाहिजेत जीर्ण अवस्थेतील वाहने बंद करण्याची गरज आहे.

**कमी वयाची मुले चालवतात भरधाव गाड्या**

भोकर शहरात कमी वयाचे बालके दुचाकी गाड्या भरधाव वेगात चालवतात. त्यांच्यावर कोणाचेच नियंत्रण नाही. वाहनांचा कर्ण कर्कश आवाज देखील करतात, अशा वाहनामुळे देखील अपघात होऊ शकतात. भोकर शहरात हे प्रमाण वाढले असून दुसऱ्या वाहनांचाही अपघात करू शकतात. अशा बालक-चालकावर बंदी घालने गरजेचे आहे. भोकर शहरातील गर्दीच्या मार्गावर लहान बालके १२ ते १३ वर्षे वयोगटातील बालके गाड्या चालवतात, त्यामुळे सुद्धा अपघात होत आहेत. भोकर शहर व ग्रामीण भागात अपघातांचे प्रमाण वाढले असून दर आठवड्याला एका व्यक्तीचा मृत्यू होत आहे. त्यामध्ये युवकांचा समावेश आहे अपघाताचे वाढते प्रमाण धोकादायक असून भरधाव वेगातील वाहनावर कारवाई करण्याची गरज आहे.



नांदेड शहरातील नमस्कार चौक ते एमजीएम कॉलेज या मुख्य रस्त्यावरील दोन्ही बाजुचे अतिक्रमण महापालिकेचे उपायुक्त स.अजितपालसिंघ संधु यांच्या नेतृत्वाखाली पोलीस बंदोबस्तात अतिक्रमण विरोधी पथकाने हटविले आहे.

# उष्माघातामुळे शेतकरी मृत्यूंचा गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेत समावेश करावा

## पीआरपीची कृषीमंत्री ना.दत्तात्रय भरणे यांच्याकडे मागणी

देगलूर/प्रतिनिधी-राज्यातील वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर शेतातील कामे करताना उष्माघातामुळे शेतकऱ्यांचे मृत्यू होत असून शासनाच्या कृषी विभागाच्या गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेत उष्माघातामुळे शेतकरी मृत्यूचा समावेश करण्यात यावा, अशा मागणी पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या वतीने देगलूरचे उपजिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्याचे कृषी मंत्री ना.दत्तात्रय भरणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत राबविण्यात येणारी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना ही शेतकरी कुटुंबांना संकट काळात आर्थिक आधार देणारी महत्त्वपूर्ण कल्याणकारी योजना आहे. मात्र या योजनेत उष्माघातामुळे होणाऱ्या मृत्यूबाबत स्पष्ट तरतूद नसल्याने अनेक शेतकरी कुटुंबे मदतीपासून वंचित राहत आहेत.सध्या राज्यात तीव्र उष्णतेची लाट असून अनेक भागांमध्ये तापमान ते अंश सेल्सिअस पर्यंत पोहोचत आहे. अशा परिस्थितीत शेतकरी हळद, कांदा, भुईमूग आदी पिकांची काढणी तसेच खरिप हंगामपूर्व मशागतीची कामे करत आहेत. कडक उन्हात दीर्घकाळ काम करताना उष्माघातामुळे शेतकऱ्यांचे मृत्यू होत असल्याच्या घटना वाढत असल्याने शासनाने तातडीने या गंभीर प्रश्नाची दखल घेण्याची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. उष्माघातामुळे होणाऱ्या शेतकरी मृत्यूंचा अपघात विमा योजनेत समावेश केल्यास मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळून मोठा दिलासा मिळेल, अशा आग्रही मागणीचे निवेदन नायब तहसीलदार विलास तेलंग यांना पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे देगलूरच्या वतीने देण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष सतीश पांडवे, सूर्याजी पाटील जाधव, प्रा.निवृत्ती भागवत, किरण कांबळे, देवेंद्र कांबळे व गौतम वनंजे आदी उपस्थित होते.

# पिसाळलेल्या श्वानाने माळेगावात सात जणांना घेतला चावा

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यात माळेगाव (मक्ता) येथे पिसाळलेल्या श्वानाने दोन दिवसांत गावभर हैदोस घालत सात नागरिक व अनेक मुक्या जनावरांना चावा घेतल्याने दहशतीचे वातावरण पसरले आहे. धक्कादायक म्हणजे, जखमींना घेऊन देगलूर उपजिल्हा रुग्णालयात पोहोचलेल्या नातेवाईकांना रेबीजचे इंजेक्शन व इम्युनोग्लोब्युलिनच उपलब्ध नाही असे सांगण्यात आले. त्यामुळे गंभीर जखमी संगाबाई अंगदराव मोतबा (७५) व कमलाबाई रघुराम डुमणे (५५) या दोन वृद्ध महिलांना जीव मुठीत धरून नांदेडला हलवावे लागले.

दि.२१ मे रोजी सायंकाळी सुरू झालेला श्वानाचा हल्ला शुक्रवारी दि.२२ मे रोजी पहाटेपर्यंत सुरूच होता. पहाटे नैसर्गिक विधीसाठी बाहेर पडलेल्या नागरिकांवर त्याने झडप घातली. या हल्ल्यात संतोष घंटेवाड (२८), संगाबाई मोतबा (७५), कमलाबाई डुमणे (५५), गजानन सोपान डोणगावे (२४) यांच्यासह तीन इतर जण जखमी झाले. अनेक गायी-वासरांनाही श्वानाने चावा घेतल्याने गावात साथीची भीती पसरली आहे. जखमींना तत्काळ देगलूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. दोन दिवस गावात धुमाकूळ घालणाऱ्या पिसाळलेल्या श्वानला पकडण्यात ग्रामपंचायत व पशुवैद्यकीय विभाग पूर्णपणे अपयशी ठरला आहे. मात्र, श्वानदंशावर अत्यावश्यक असलेली अँटी रेबीज व्हॅक्सिन व इम्युनोग्लोब्युलिन इंजेक्शन उपलब्ध नसल्याचे सांगत डॉक्टरांनी हात वर केले. इंजेक्शनसाठी नांदेडलाजा हा एकच उपाय नातेवाईकांना देण्यात आला.

# कुरुंदकर प्रतिष्ठान-भांडारकर संशोधन केंद्रात सामंजस्य करार

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड येथील नरहर कुरुंदकर प्रतिष्ठान आणि पुणे येथील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन केंद्र यांच्यामध्ये नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरा, विविध कला आणि अभ्यासशाखांचा परिचय करून देणाऱ्या ऑनलाईन अभ्यासक्रमांच्या प्रसारासाठी हा करार महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

भांडारकर संशोधन केंद्राच्या वतीने भारत विद्या या प्लॅटफॉर्मवर विविध ऑनलाईन अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत. नवीन शैक्षणिक धोरणानुसार तयार करण्यात आलेले हे अभ्यासक्रम महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरणार असून, त्यांच्या प्रसारासाठी मराठवाडा आणि विदर्भ विभागात समन्वय भागीदार म्हणून नरहर कुरुंदकर प्रतिष्ठान कार्य करणार आहे. या उपक्रमाचे समन्वयक म्हणून नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केंद्राचे संचालक डॉ. यशवंत जोशी कार्य पाहणार आहेत.सामंजस्य करारावर नरहर कुरुंदकर प्रतिष्ठानच्या अध्यक्षा प्रा. सौ. श्यामल पत्की तसेच भांडारकर प्राच्यविद्या संशोधन केंद्राच्या रेग्युलेटिंग कौन्सिलचे सदस्य मनोज एरंडे यांनी स्वाक्षऱ्या केल्या.यावेळी भांडारकर संशोधन केंद्राचे भारतविद्या प्रकल्प प्रमुख चिन्मय भंडारी, कुरुंदकर प्रतिष्ठानचे विश्वस्त डॉ. श्रीनिवास पांडे, दिपनाथ पत्की तसेच प्रा. कार्तिक जाधव उपस्थित होते.



# कॅनरा बँकेच्या विमा योजनेतून वारसास दोन लाखांची मदत

नांदेड/प्रतिनिधी-येथील कॅनरा बँकेच्या नरसी-नायगाव शाखेमार्फत प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (पीएमजेजेबीवाय) अंतर्गत खातेदाराच्या वारसास दोन लाख रुपयांची विमा मदत प्रदान करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित खातेदाराने कॅनरा बँकेतील बचत खात्याद्वारे प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेचा लाभ घेत विमा संरक्षण घेतले होते. दरम्यान, हृदय-विकाराच्या झटक्याने खातेदाराचे निधन झाले. त्यानंतर बँकेच्या माध्यमातून आवश्यक कागद-पत्रांची पूर्तता करून वारसदारांना विमा दाव्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.या योजनेअंतर्गत वारसदारांना दोन लाख रुपयांची विमा रक्कम मंजूर करण्यात आली असून, संबंधित वारसदारांच्या खात्यात ही रक्कम जमा करण्यात आली. यावेळी वारसदारांना बँक पासबुक तसेच प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेचे प्रमाणपत्र देण्यात आले.या प्रसंगी शाखा व्यवस्थापक गंगाधर जाधव, बँक अधिकारी अमोल सोनकांबळे, मीरा हुंबड, शुभांगी डोईफोडे, भगवान भोसले, नागेश खेळकर आदी उपस्थित होते.



# भोकर तालुक्यातील ३ मंडळात पीक वीमा तात्काळ मंजूर करा

## राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष सुरेश बिल्लेवाड यांची मागणी

भोकर/प्रतिनिधी-तालुक्यातील भोकर, भोशी, किनी या मंडळात पिकांचे अतोनात नुकसान होऊन सुद्धा पिक विमा मंजूर झाला नाही तो तात्काळ मंजूर करावा अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुका अध्यक्ष सुरेश बिल्लेवाड यांनी जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, भोकर तालुक्यात मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीने पाच मंडळातील शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला होता मातुळ, मोघाळी या दोन मंडळाला पिक विमा मंजूर झाला पण भोकर, भोशी, किनी या मंडळात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी होऊन अतोनात पिकांचे नुकसान झाले मात्र पीक विमा मंजूर झाला नाही या तीन मंडळातील १५,१९९ पिक विमाधारक असून २०.३४ कोटी विमा रकमेपासून शेतकरी वंचित राहिले आहेत यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय झाला असून ही बाब वेदनादायक आहे तात्काळ या भागातील शेतकऱ्यांचा पिक विमा मंजूर करावा अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुका अध्यक्ष सुरेश बिल्लेवाड यांनी निवेदनात केली आहे तहसीलदार भोकर यांच्यामार्फत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन पाठवण्यात आले आहे.



# मुक्रमाबाद येथील लेंडी प्रकल्पग्रस्तांना वाढीव कुटुंबांना अद्याप मोबदला नाही

मुखेड/प्रतिनिधी-तालुक्यातील मुक्रमाबाद येथील लेंडी धरण प्रकल्प अनेक वर्षांपासून प्रलंबित असून धरणग्रस्त नागरिकांचे प्रश्न आजही कायम आहेत. या वाढीव कुटुंबांना अद्यापपर्यंत मोबदला मिळालेला नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मोबदला व पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत अनेक कुटुंबांचे जीवन अनिश्चिततेत अडकले आहे.

धरण प्रकल्पामुळे बाधित झालेल्या अनेक कुटुंबांचे पुनर्वसन अद्याप पूर्ण झालेले नाही. वाढीव कुटुंबांना स्वतंत्र लाभ देण्यात यावा, अशी मागणी नागरिकांकडून सातत्याने करण्यात येत आहे. मात्र प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अनेक कुटुंबे पुनर्वसनाच्या हक्कापासून वंचित राहत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. गेल्या वर्षी अतिवृष्टीच्या काळात या परिसरात जीवित हानीची घटना घडली होती. त्यानंतरही प्रशासनाने ठोस उपाययोजना न केल्याने येथील पावसाळ्यात गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. वेळेत मोबदला व पुनर्वसनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यास नागरिक घरे सोडण्यास तयार असल्याचे ग्रामस्थांनी स्पष्ट केले. धरणग्रस्तांचा प्रश्न तातडीने मार्गी लावून वाढीव कुटुंबांना न्याय द्यावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे. प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित निर्णय घेण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

# २५ हजारांच्या लाचेची मागणी करणाऱ्या आजी व माजी विस्तार अधिकाऱ्याविरुद्ध गुन्हा

मुखेड/प्रतिनिधी-डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन योजने अंतर्गत मंजूर झालेल्या सिंचन विहिरीचा दुसरा हप्ता बँकेत जमा करण्याच्या बदल्यात २५ हजार रुपयांची लाच मागितल्या प्रकरणी मुखेड पंचायत समितीमधील कृषी विस्तार अधिकारी आणि एका सेवानिवृत्त विस्तार अधिकाऱ्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली आहे. याप्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध मुखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार यांच्या मोठ्या भावाच्या नावे मौजे कुंद्राळा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन/विशेष घटक योजनेअंतर्गत सिंचन विहीर मंजूर झाली होती. विहिरीचे खोदकाम पूर्ण झाल्यानंतर, सिमेंटचे कडे टाकण्यासाठी २,०५,००० रुपयांचा दुसरा हप्ता मंजूर करून तो बँकेत जमा करायचा होता. मात्र, हा निधी खात्यावर टाकण्यासाठी विस्तार अधिकारी अमोल राठोड आणि सेवानिवृत्त अधिकारी गणपतराव शिंदे यांनी तक्रारदाराकडे २५,००० रुपयांच्या लाचेची मागणी केली. तक्रारदाराने या प्रकरणी थेट लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे रीतसर तक्रार नोंदवली. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी 'एसीबी'ने केलेल्या पडताळणीत, अमोल राठोड याने सेवानिवृत्त अधिकारी शिंदे याच्यामार्फत लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. चर्चेदरम्यान, सुरुवातीला २० हजार रुपये आणि काम पूर्ण झाल्यावर ५ हजार रुपये देण्याचे ठरले होते. यानंतर लाचलुचपत विभागाने २७ फेब्रुवारी, ४ मार्च आणि २० मे २०२६ रोजी आरोपींना रंगेहात पकडण्यासाठी सापळा रचला होता. मात्र, सेवानिवृत्त विस्तार अधिकारी शिंदे याला तक्रारदाराचा संशय आल्याने त्याने ऐनवेळी लाचेची रक्कम स्वीकारण्यास नकार दिला. त्यामुळे आरोपींना प्रत्यक्ष रक्कम घेताना पकडता आले नाही.जरी प्रत्यक्ष लाचेची रक्कम स्वीकारली गेली नसली, तरी कायदेशीर पडताळणीत लाचेची मागणी केल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे दोन्ही आरोपींविरुद्ध मुखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेडचे पोलीस उप अधीक्षक प्रशांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुरेश बनसोडे आणि त्यांच्या पथकाने केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक अर्चना करपुडे करत आहेत.

## विहिरीत बुडून कोठारी येथील तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

मांडवी/प्रतिनिधी-एका शेतातील विहिरीवर गेलेल्या एका २२ वर्षीय तरुणाचा पाण्याचा अंदाज न आल्याने पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना कोठारी शिवारात आज दि.२३ मे रोजी घडली आहे. राहुल भारत तोडसाम (वय २२, रा. कोठारी) असे मृत तरुणाचे नाव आहे.

राहुल तोडसाम हा तरुण सकाळी दहा वाजताच्या सुमारास कोठारी शिवारातील एका शेतातील विहिरीवर गेला होता. मात्र, विहिरीतील पाण्याचा अचूक अंदाज न आल्यामुळे तो खोल पाण्यात बुडाला. ही धक्कादायक घटना कोठारी, जमुनानगर आणि रामजी नाईक तांडा येथील नागरिकांना समजताच घटनास्थळावर गावकऱ्यांनी प्रचंड गर्दी केली.घटनेची माहिती मिळताच मांडवी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गंगाधर गायकवाड, तलाठी रेड्डीवार यांच्यासह सर्व पोलीस पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. विहिरीत पाण्याचा साठा जास्त असल्याने सुरुवातीला अडचणी येत होत्या. मात्र, जमुनानगर, रामजी नाईक तांडा आणि कोठारी येथील स्थानिक तरुणांनी जीवाची पर्वा न करता विहिरीत उड्या मारल्या आणि अथक परिश्रमानंतर राहुलचा मृतदेह विहिरीबाहेर काढला. मृतदेह विहिरीबाहेर काढल्यानंतर पोलिसांनी पंचनामा केला.

## लिज संपली तरी जमीन नाही परत;बाजार समितीच्या कोट्यवधींच्या विकासाला सह्याद्री जिनिंगचा अडथळा?

माहूर/प्रतिनिधी-कृषि उत्पन्न बाजार समिती माहूरच्या मालकीची तब्बल १ हेक्टर २१ आर जमीन लिजची मुदत संपल्यानंतरही परत न करता सह्याद्री जिनिंग प्रेसिंग सहकारी संस्था माहूरकडून टाळाटाळ सुरू असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. याप्रकरणी बाजार समितीच्या संचालक मंडळाने ठराव करून जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांच्याकडे तक्रार दाखल केली असून संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

सन १९९४ मध्ये शेतकऱ्यांच्या हितासाठी जिनिंग उभारणीच्या उद्देशाने बाजार समितीच्या सर्वे नं. १ (अ) मधील जमीन केवळ नाममात्र दोन हजार रुपये वार्षिक भाड्याने तब्बल २८ वर्षांच्या लिजवर सह्याद्री जिनिंग प्रेसिंग सहकारी संस्थेला देण्यात आली होती. मात्र या लिजची मुदत ११ सप्टेंबर २०२२ रोजी संपुष्टात आल्यानंतरही संबंधित संस्थेकडून आजपर्यंत जमीन बाजार समितीच्या ताब्यात देण्यात आलेली नाही. विशेष म्हणजे, भाडेपट्टा करारामध्ये सदर जमीन कोणासही गहाण अथवा दान करणार नाही, तसेच लिज संपताच मूळ स्थितीत जमीन बाजार समितीच्या ताब्यात देण्यात येईल, अशी स्पष्ट अट असतानाही संबंधित संस्थेने नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे हीच जमीन मॉर्गेज करून तब्बल ११ लाख ९० हजारांचे कर्ज उचलल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे बाजार समितीच्या मालकीच्या जमिनीवर बँकेचा बोजा चढल्याने सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे. नियमबाह्य मॉर्गेजला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल आता बाजार समितीच्या वर्तुळातून उपस्थित केला जात आहे. बाजार समितीची परवानगी नसताना जमीन गहाण ठेवण्याचा अधिकार संस्थेला कोणी दिला? बँकेने कोणत्या कागदपत्रांच्या आधारे कर्ज मंजूर केले? आणि संबंधित अधिकाऱ्यांनी डोळेझाक केली का? अशा अनेक प्रश्नांनी या प्रकरणाला गंभीर वळण मिळाले आहे. या वादग्रस्त प्रकारामुळे बाजार समितीच्या विकासकामांनाही मोठा फटका बसत असल्याचे समोर आले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन उभारणीसाठी तब्बल १ कोटी ५२ लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळूनही जागा उपलब्ध नसल्याने काम रखडल्याचा गंभीर मुद्दा तक्रारीत नमूद करण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या नावाखाली दिलेली जमीन आता आर्थिक व्यवहारांच्या आणि संस्थात्मक अनागोंदीच्या भोवऱ्यात अडकली असल्याची चर्चा तालुक्यात रंगू लागली आहे.




बाजार समितीकडून संबंधित संस्था व बँकेला वारंवार लेखी आणि तोंडी पत्रव्यवहार करूनही जमीन परत देण्यास टाळाटाळ सुरूच असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे हा प्रकार केवळ निष्काळजीपणा नसून नियमांची उघड पायमल्ली असल्याचे बोलले जात आहे. दि. २९ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत ठराव क्रमांक ७ (१) मंजूर करून या संपूर्ण प्रकरणात तातडीने चौकशी करून जमीन बाजार समितीच्या ताब्यात देण्यात यावी, तसेच दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## देगलूरात खतांच्या तुटवड्याविरोधात २५ रोजी बंदची हाक

देगलूर/प्रतिनिधी-खरीप हंगाम तोंडावर आला असताना डीएपी, युरिया आदी रासायनिक खतांचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने शेतकऱ्यांमध्ये मोठी नाराजी पसरली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना तातडीने मुबलक प्रमाणात खते उपलब्ध करून द्यावीत, या मागणीसाठी सोमवार दि.२५ मे रोजी देगलूर येथे कृषी सेवा केंद्रे तसेच मोंढा बाजारातील आडत दुकाने बंद ठेवून आंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

खरीप हंगामातील सोयाबीन, मुग, उडीद, कापूस आदी पिकांच्या पेरणीसाठी डीएपी व युरिया खतांची अत्यंत गरज असताना शेतकऱ्यांना खते सहज उपलब्ध होत नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. खतांच्या टंचाईमुळे अनेक शेतकऱ्यांना तेलंगणा, आंध्र प्रदेश व कर्नाटक राज्यांत जाऊन जादा दराने खते खरेदी करावी लागत असल्याने त्यांना मानसिक, आर्थिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या घोषणा करणाऱ्या शासनाकडून अन्नदात्यालाच आवश्यक खते उपलब्ध होत नसल्याबद्दल संताप व्यक्त करण्यात आला आहे. खरीप हंगामासाठी डीएपी, युरिया आदी रासायनिक खते मुबलक प्रमाणात उपलब्ध करून द्यावीत, अन्यथा आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

या संदर्भात जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी, गटविकास अधिकारी, पोलिस निरीक्षक, आडत व्यापारी संघटना तसेच कृषी सेवा केंद्र संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. हे निवेदन शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने सादर केले. यावेळी माजी जि.प.सदस्य नागनाथ वाडेकर, शिवसेना शहरप्रमुख भगवान जाधव, बाबुराव मिनकीकर, भागवत पाटील सोमुरकर, विनोद सोनकांबळे, संतोष कांबळे, सय्यद मिरभाई, गंगाधर पाटील चाकूरकर, राजू उल्लेवार, हणमंत राजुरे लख्खेकर, संजय पाटील लख्खेकर, दत्तात्रय बेंजलवार, शिवाजी चव्हाण, शिवाजी पाटील ढोसणीकर, गंगाधर वकंलवार, अर्जुन लुटे, राजू जाधव तडखेलतांडा, अजित पाटील पाळेकर, संजीव मंगरुळे, सिद्धेश्वर आयनेलवार, सायबू विभुते यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## दुचाकी अडवून तरुणीचा विनयभंग

उमरखेड/प्रतिनिधी-खासगी नोकरी करण्यासाठी सहकारी मैत्रिणीसोबत बाहेरगावी आलेल्या एका तरुणीचा रस्ता अडवून विनयभंग केल्याची घटना उमरखेड तालुक्यातील ब्राह्मणगाव येथे २१ मे च्या सायंकाळी घडली. या घटनेचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या पीडितेच्या चुलत्यावरच आरोपीच्या भावाने वीट फेकून हल्ला केल्या प्रकरणी उमरखेड पोलिसांनी दोघांवर ॲट्रॉसिटीसह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.

अंबादास गोपाळा मोहिते असे अटक केलेल्या मुख्य आरोपीचे नाव असून, त्याचा चुलत भाऊ केशव मोहिते हा फरार आहे. पीडित तरुणी आणि तिची मैत्रीण काम संपवून गावाकडे परतत असताना, आरोपी अंबादास मोहिते याने त्यांची दुचाकी अडवून चावी हिसकावली आणि माझ्याशी लग्न कर, असे म्हणत तरुणीचा विनयभंग केला. तसेच तिच्या मैत्रिणीचा मोबाईल हिसकावून घेत कोयत्याने जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेची माहिती मिळताच पीडितेच्या काकांनी आरोपीच्या घरी जाऊन जाब विचारला. याचा राग येऊन केशव मोहिते याने त्यांच्या नाकावर वीट मारून त्यांना गंभीर जखमी केले. या घटनेमुळे गावात शेकडो लोकांचा जमाव जमून तणाव निर्माण झाला होता.उमरखेड पोलीस ठाण्याच्या एपीआय सारिका राऊत, बिटरगावचे ठाणेदार पांडुरंग शिंदे आणि डीबी स्कॉडने तातडीने घटना स्थळी धाव घेत घरात लपलेल्या मुख्य आरोपीला अटक केली या पैकी दुसरा आरोपी मात्र फरार झाल्याचे समजले.

## चंद्रपूर दुर्घटनेनंतर शिवनी वनपरिक्षेत्र सतर्क; शेतकरी,नागरिकांना खबरदारीचा इशारा

किनवट/प्रतिनिधी-चंद्रपूर जिल्ह्यातील दूर्भाग्य घटनेच्या पार्श्वभूमीवर शिवनी वनपरिक्षेत्रातील लोकांनी जंगलात अथवा शेतीच्या कामासाठी जात असताना सावधगिरी म्हणून किमान चार-पाच लोकांनी मिळून गेल्यास हिंस्त्र वन्य प्राण्यांपासून उद्भवणारा धोका टाळता येईल. या उपरही अडचण आल्यास वनविकास महामंडळाच्या शिवनी वनपरिक्षेत्राशी संपर्क साधण्याचे आवाहन वनपरिक्षेत्राकारी संतोष चोले यांनी केले आहे.

जंगलातील मोहफूलं, तेन्दूपाने, डिंक, जळतन असो अशा कामांसाठी जंगलात जायचे असो की, जंगल किनारी असलेल्या शेतीत कामासाठी जाणारे शेतकरी असोत, तमाम नागरिकांनी वन्यप्राण्यापासून सांभाळून राहण्यासाठी खबरदारी घ्यायला हवी. दोन महिन्यांपूर्वी शिवनी सज्जाच्या हद्दीतील शेतकऱ्यांवर हिंस्त्र वन्य प्राण्यांचा हल्ला आणि त्यातून उद्भवलेली परिस्थिती लक्षात घेता प्रत्येकाने सजग राहिल्यास अनर्थ टाळला जाऊ शकतो. परवाच चंद्रपूर जिल्ह्यातील चार नागरिक शिकार झालेत. अशा दुर्घटना आपल्या परिसरात होऊ नये याची सर्वांनी काळजी घ्यावी असे, वनविकास महामंडळाचे शिवनी येथील वनपरिक्षेत्र अधिकारी चोले यांनी कळविले आहे. काही अडचण असल्यास त्वरित वनपरिक्षेत्रातील अधिकारी शिवनी यांच्याशी संपर्क करावाळून शेतीवर व इतरत्र फिरत असताना वन्यप्राण्यापासून सांभाळून जावे ही विनंती. अशा प्रकारची दुर्घटना आपल्या परिसरात होऊ नये याची काळजी घेण्यात यावी काही अडचण आल्यास शिवनी वनपरिक्षेत्र कार्यालयाशी संपर्क साधल्यास प्रशासन आपल्या मदतीला धावून येईल असा विश्वास वनपरिक्षेत्राधिकारी चोले यांनी व्यक्त केला आहे.



नांदेड जिल्ह्यात दिवसेंदिवस उन्हाची तीव्रता वाढली असून अंगाची लाहीलाही होत आहे. शहरातील बाजारपेठेत नागरिकांकडून कुलरची खरेदी मोठ्या प्रमाणात केली जात आहे. (छाया : करणसिंह बैस)

पान १ वरुन

### महायुतीच्या जागा वाटप...

ठरवताना संबंधित पक्षाची सिटिंग जागा त्या पक्षाकडेच राहील, हा प्रमुख निकष ठेवला जातो. उर्वरित जागांबाबत चर्चा करताना कोणत्या पक्षाचे संख्याबळ अधिक आहे, हे पाहिले जाते. याच सूत्रानुसार लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये जागावाटप करण्यात आले होते.तसेच, विधान परिषद निवडणुकीसाठी महायुतीमधील जागावाटपाची चर्चा अंतिम टप्प्यात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत लवकरच महत्त्वाची बैठक होणार असून, त्यानंतर जागावाटपाचे अंतिम गणित स्पष्ट होईल, असेही बावनकुळे यांनी सांगितले.दरम्यान, काही दिवसांपूर्वी परिवहन मंत्री आणि शिवसेना आमदार प्रताप सरनाईक यांनीही शिवसेनेच्या भूमिकेबाबत स्पष्ट संकेत दिले होते. विधान परिषदेसाठी कोणाला उमेदवारी द्यायची याचा अंतिम निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे घेतील. धुळे आणि कोकण भागात पूर्वी आमचे ५ आमदार होते. आता पक्षाची ताकद वाढल्याने आम्ही ७ जागांची मागणी केली आहे. याबाबत महायुतीचे प्रमुख नेते एकत्रित चर्चा करून अंतिम निर्णय घेतील, असे सरनाईक यांनी म्हटले होते.

## भाजपाचा बूथस्तरावर फोकस;२५ रोजी बीएलए कार्यकर्त्यांची व्यापक बैठक

किनवट/प्रतिनिधी-किनवट-माहूर विधानसभेच्या एसआयआर मॅपिंग प्रक्रिये बाबत बीएलए-२ यांची २५ मे रोजी सकाळी ११ वाजता कार्यशाळा आयोजित केली आहे.

कोठारी येथील कमलाबाई ठमके महाविद्यालयात व्यापक बैठक घेण्यात येत असल्यामुळे बीएलए-२ आणि भाजपा पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी उपस्थित राहाण्याचे आवाहन बीएलए-१ किनवट/माहूर विधानसभा प्रमुख बाबूराव केंद्रे, माहूर मंडळाध्यक्ष निळकंठ मस्के, किनवट शहराध्यक्ष स्वागत आयनेनीवार, किनवट उत्तर मंडळचे उमाकांत कऱ्हाळे आणि दक्षिण मंडळाध्यक्ष सूर्यकांत आरंडकर यांनी केले आहे. किनवट-माहूर विधानसभेचे आ.भीमराव केराम, भाजपा प्रदेशउपाध्यक्ष संजयभाऊ कौडगे, भाजपा नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, जिल्हा समन्वयक अतुल मुंडलिक यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक आयोजित केली असून आढावा, पुढील कार्याच्या दिशादर्शकतेसाठी म्हणून या बैठकीला अनन्यसाधारण महत्त्व असल्यामुळे सर्वच बीएलए-२ आणि भाजपा पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांनी उपस्थित रहाण्याचे आवाहन केले आहे. कोठारी येथील कमलताई ठमके महाविद्यालयात बैठक संपन्न होणार आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे लक्ष समोर ठेवून भाजपा सर्व आघाड्यांवर कसे पायाभूत काम करते यापेक्षा उत्तम उदाहरण वेगळे असूच शकत नाही. ईव्हीएम मशिनवर पराभवाचे खापर फोडून अपप्रचारात वेळ गमावण्यापेक्षा ध्येय धोरण रेखांकित केल्यास तशांचा पक्ष बळकट होईल आणि कार्यकर्त्यांचे राजकीय भवितव्य सुद्धा उज्ज्वल होईल. असा आशावाद अनेकांनी व्यक्त केला आहे.

पान १ वरुन

### नांदेड पोलीसांची कारवाई:...

आरोपी रणजितसिंघ सरदार याच्या विरुध्द वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वी नांदेड ग्रामीण पोलीसांनी याच भागात कारवाई करुन शस्त्रांचा मोठा साठा जप्त केला होता. पोलीसांच्या कारवाईमुळे शस्त्रांची अवैध विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

### राज्याकडे मान्सूनची...

४७.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून हे शहर देशातील सर्वाधिक तापलेले ठरले आहे. अकोला, अमरावती आणि वर्धा जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला असून नागपूर आणि यवतमाळ जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

### 'कॉक्रोच'चे संस्थापक...

आता अभिजीत दिपकेंच्या हिंगोलीतील घराबाहेर सुरक्षा तैनात केली आहे. अभिजीत दिपकेंना दोन दिवसांपूर्वीच जीवे मारण्याची धमकी मिळाल होती, धमकी देणाऱ्याच्या मेसजचा स्क्रिनशॉट ट्विट करत दिपकेंनी ही माहिती दिली. तसेच, सोशल मीडियातून मोठ्या प्रमाणात त्यांचे समर्थन होऊ लागल्यानंतर त्यांच्यावर टीकेची झोडही उठली आहे. त्याच पार्श्वभूमीवर आज हिंगोली पोलिसांनी अभिजीत यांच्या घराबाहेर सुरक्षा तैनात केली आहे. पुढील काही दिवस त्याच्या घराला सुरक्षा कायम राहील, असेही पोलीस उपायुक्त पंकज अतुलकर यांनी यांनी बोलताना सांगितलं.

### भर उन्हात जनगणनेसाठी...

तितकेच आवश्यक असल्याची भावना व्यक्त होत आहे. दरवेळी निवडणुका, सर्वेक्षण, जनगणना, विविध योजना अंमलबजावणी यासाठी शिक्षकांनाच वेठीस धरण्याची परंपरा आता थांबविण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे. शिक्षण व्यवस्था आधीच अनेक समस्यांनी ग्रासलेली असताना शिक्षकांना अशैक्षणिक कामांच्या ओझ्याखाली दबविण्याचा प्रकार हा शिक्षण व्यवस्थेलाच कमकुवत करणारा असल्याची टीकाही जागरूक पालकांकडून होत आहे.


## जनगणना कामाच्या पाहणीसाठी केंद्रीय पथकाची लोहा तालुक्यास भेट

नांदेड/प्रतिनिधी-जनगणना २०२७ अंतर्गत सुरू असलेल्या कामाच्या पाहणीसाठी आज २२ मे रोजी जनगणना केंद्रीय पथकाने लोहा तालुक्यास भेट दिली.

या पथकात जनगणना सहसंचालक शर्मा, सहाय्यक संचालक पांडे, श्री.बी. प्रसाद तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथील जनगणना कक्ष सहाय्यक लतीफ पठाण यांचा समावेश होता.संबंधित अधिकाऱ्यांनी सर्व पर्यवेक्षकांची बैठक घेऊन आवश्यक सूचना व मार्गदर्शन केले. तसेच तालुक्यात आतापर्यंत झालेल्या जनगणना कामाचे कौतुक करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी लोहा जनगणना ग्रामीण चार्ज अंतर्गत सर्वप्रथम जनगणनेचे नियुक्त काम पूर्ण करणारे प्रगणक श्री. लिंगोजी गणपती वाघमारे (सहशिक्षक) तसेच संबंधित पर्यवेक्षकांचा सत्कार करण्यात आला. तहसीलदार तथा चार्ज अधिकारी (ग्रामीण) लोहा विठ्ठल परळीकर यांनी नियुक्त ६४ पर्यवेक्षकांना त्यांच्या अखत्यारीतील ३५९ प्रगणकांकडून जनगणनेचे काम अचूक व वेळेत पूर्ण करून घेण्याच्या सूचना दिल्या आणि पुढील कामकाजासाठी शुभेच्छा दिल्या.

## स्वामी बासरवार यांचे निधन

मांडवी/प्रतिनिधी-मांडवी येथील स्वामी गंगन्ना बासरवार (वय ६८ वर्ष) यांचे आज दि.२३ मे रोजी हृदय विकाराच्या



झटक्याने दुःखद निधन झाले.

गेल्या अनेक वर्षांपासून ते मांडवी पोस्ट ऑफिस मध्ये कार्यरत होते.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सून व नातवंड असा परिवार आहे. आज दि. २३ मे रोजी मांडवीच्या सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यविधी करण्यात आले.

## मटका अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील गोकुळनगर रोडवर सुरु असलेल्या मटका अड्डयावर स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी धाड टाकुन चार जणांना अटक करण्यात आली.

गोकुळनगर रोडवर सर्रासपणे जुगार अड्डा सुरु होता. पोलीसाच्या पथकाने गुरुवारी धाड टाकुन चार जणांना रंगेहाथ पकडले आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४